OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

दिनाक :- ०९/०८/२०२५

प्रति,

संपादक,

------------------------------

विषय :- स्थानीक गुन्हे शाखा जळगाव ची जुगार अड्ड्यावर धडक कारवाई...

जळगाव जिल्ह्यात तसेच शहरात अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी सो. पोलीस अधीक्षक जळगाव, यांनी स्थानीक गुन्हे शाखा जळगाव यांना आदेशीत केले आहे. त्यावरुन रामानंद नगर पोलीस ठाणे हद्दीत हरीविठ्ठल नगर भागात पत्याच्या अड्डा चालु असल्याबाबत श्री संदीप पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानीक गुन्हे शाखा जळगाव यांना गोपनीय माहीती प्राप्त झाली होती त्यावरुन नमुद जुगाराच्या अड्ड्यावर कारवाई करण्याकामी पोलीस उपनिरीक्षक शरद बागल यांना कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्यावरुन दिंनाक ०८/०८/२०२५ रोजी २२.१५ वाजताच्या सुमारास धाड टाकुन ०९ आरोपीतांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडुन रोख रक्कम तसेच इतर साहीत्य (मोटरसायकल, मोबाईल) असे एकुण ३,१४,३४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांच्यावर रामानंद नगर पोलीस ठाणेस जुगार प्रतिबंधक कायदा १८८७ कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, नमुद गुन्हयाचा पुढील तपास रामानंदनगर पोलीस करत आहेत.

सदरची कारवाई मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी सो. पोलीस अधीक्षक जळगाव, मा.श्री. अशोक नखाते सो.अपर पोलीस अधीक्षक जळगाव भाग, तसेच मा.श्री. संदीप गावीत उपविभागीय पोलीस अधिकारी सो.जळगाव उपविभाग, श्री.संदीप पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा जळगाव, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, पोहवा अकरम शेख, विजय पाटील, नितीन बावीस्कर, प्रविण भालेराव, मुरलीधर धनगर, पोना किशोर पाटील, पोशि रविंद्र कापडणे यांच्या पथकाने केली आहे.

**( संदीप पाटील )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव

